१४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयांचे नुतनीकरण (Re-designing of Existing Courts) कौटुंबिक न्यायालय, नागपूर येथील न्यायालयीन इमारतींच्या दुरुस्तीस / नुतनीकरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : चौविआ १२१६/प्र.क्र.१५५/का.०९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १८ मे, २०१८

वाचा :

१) प्रबंधक (निरीक्षणे-२), मा. उच्च न्यायालय यांचे पत्र क्रमांक B(W) ६०४९ of २०१०/२२४५, दिनांक ११.०८.२०१६.
२) कौटुंबिक न्यायालय, नागपूर यांचे पत्र क्र.D-२(१)/४३९/२०१६, दि.२२.०६.२०१६
३) शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः चौविआ १२१६/प्र.क्र.१०७/१६/का.नऊ, दिनांक १० नोव्हेंबर, २०१६
४) शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः चौविआ १२१६/प्र.क्र.१०/का.नऊ, दिनांक १२ जून, २०१७
५) शासन शुद्धीपत्रक क्रमांकः चौविआ १२१६/प्र.क्र.१०/का.नऊ, दिनांक २३ जून, २०१७

प्रस्तावना :

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या "न्याय व्यवस्थेचे सक्षमीकरण" (Strengthening the Justice Sector) या प्रयोजनासाठी सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या ५ वर्षांच्या कालावधीकरीता रुपये १०१४ कोटी इतका निधी नमूद केलेला आहे. १४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयांचे नुतनीकरण या घटकासाठी ५ वर्षांच्या कालावधीकरीता रुपये २२८ कोटी इतका निधी दर्शविलेला आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार विविध प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ९ मार्च, २०१६ रोजी उच्चस्तरीय संनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीच्या बैठकीमध्ये मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण या घटकाच्या कृती आराखड्यास तत्वत: मान्यता देण्यात आली असून संदर्भाधीन दिनांक १२ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाच्या सहमतीने १४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण च्या कामांना रुपये ५० लक्ष मर्यादेपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले

आहेत. त्या अनुषंगाने कौटुंबिक न्यायालय, नागपूर येथील न्यायालयीन इमारतीच्या नुतनीकरणाचे सन २०१५-१६ च्या दरसूचीवरील अंदाजपत्रकासह प्रस्ताव उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथे नमूद पत्रान्वये मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने कौटुंबिक न्यायालय, नागपूर येथील न्यायालयीन इमारतीच्या १४ व्या वित्त आयोगांतर्गत नुतनीकरणाच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत राज्यातील कार्यरत न्यायालयांचे नुतनीकरण (Redesigning of Existing Courts) या घटकाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित करुन दिलेल्या कौटुंबिक न्यायालय, नागपूर यांच्या न्यायालयीन इमारतीच्या नुतनीकरणासाठी आवश्यक रु.२,७१,०९४/- (रुपये दोन लक्ष एकाहत्तर हजार पाचशे चौ-यान्नव फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

न्यायालयीन इमारत:- कौटुंबिक न्यायालय, नागपूर

अ.क्र.	१४ व्या वित्त आयोगांतर्गत प्रस्तावित कामे	सार्वजनिक बांधकाम विभागाने अंदाजपत्रकात परिगणित केलेली रक्कम कामाचा अंदाजित खर्च
१.	Providing and fixing witness box and wheel chairs	२,२६,१००/-
	Add for increase in schedule of rates १०%	२२,६१०/-
	एकूण	२,४८,७१०/-
	Add ४% Contengencies	९९४८/-
	Add ५% centage	१२४३६/-
	एकूण	**२,७१,०९४/-**

२. कौटुंबिक न्यायालय, नागपूर येथील न्यायालयीन इमारतींच्या नुतनीकरणाचा खर्च मागणी क्रमांक " जे-१, २०१४, (००) न्यायदान, १०२- उच्च न्यायालये, (११) कार्यरत न्यायालयांचे नविनीकरण, (११)(०१) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण (२०१४ ०५४८) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर कामाची निविदा मागविण्यापूर्वी मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी निश्चित केलेल्या कृती आराखडा व Dedicated Cell तसेच उच्चस्तरीय संनियंत्रण समितीने निश्चित केलेल्या कामांमधीलच उपरोक्त कामे असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी प्रमुख न्यायाधिश, कौटुंबिक न्यायालय, नागपूर यांची राहील. प्रचलित कार्यपद्धतीचा अवलंब करुन निविदा प्रक्रीया सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविण्यात यावी व या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करावी.

४. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र.३१४/इमा-२, दिनांक २७.०९.२०१६ अन्वये व त्या विभागाच्या सहमतीने तसेच, शासन निर्णय, विधि व न्याय विभाग दिनांक १२.०६.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२४१६३१५९०४१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b3555 88753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97d c13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.05.24 16:31:42 +05'30'

(अ. श्या. कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधान परीषद/विधानसभा.
४. मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
५. प्रबंधक (निरीक्षणे-१ व २), मा.उच्च न्यायालय, मुंबई.
६. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर.
७. प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, नागपूर.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता १/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९. महालेखापाल (लेखा परीक्षा १/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
११.उप जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१२.वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
१३.सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
१४.विधी व न्याय विभाग (का.२३), मंत्रालय, मुंबई
१५.निवडनस्ती (का-९)